# कर बुडव्यांना आता अटक व मालमत्ता जप्त

## प्राप्तिकर विभागाच्या दोषींवर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना

**नवी दिल्ली :** प्राप्तिकर बुडविणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असून, हे रोखण्यासाठी प्राप्तिकर विभागाने अधिकाऱ्यांना अशा प्रकरणांमध्ये दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. याअंतर्गत कर बुडविणाऱ्यांना अटक करणे, ताब्यात घेणे यासह मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल.

यासंबंधी चालू आर्थिक वर्षासाठी कारवाईचा आराखडा केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) तयार केला आहे. कर चुकवेगिरी करणाऱ्या व्यक्तीला प्राप्तिकर कायदा कलम २७६ उपकलम क (२) नुसार तीन महिने ते तीन वर्षे कारावासाची शिक्षा व दंड करता येतो. विभागाकडून अगदी अपवादाने ही कारवाई करण्यात येते. आता मात्र, अधिकाऱ्यांनी जास्तीतजास्त प्रमाणात कारवाई करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी कर वसुली अधिकारी (टीआरओ) नेमण्यात आले असून, ते ही कारवाई करतील. तसेच, टीआरओना पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून दिले जाणार आहे. यासोबत त्यांना कार्यक्षमता वाढविण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. नोटीस बजावूनही कर बुडविणाऱ्या व्यक्तीला अटक, तसेच ताब्यात घेण्याची कायदेशीर तरतूद परिशिष्ट २ मधील नियम ७३ ते ८१ मध्ये आहे. कर लवादासमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या २.३२ लाखांवरून २.५८ लाखांवर गेली आहे. चालू आर्थिक वर्षासाठी १.३३ लाख प्रकरणे निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**विवरणपत्र न भरणाऱ्यांच्या संख्येत वाढ**

प्राप्तिकर विवरणपत्र न भरणाऱ्या करपात्र व्यक्तींची संख्या २०१४ मध्ये २२.०९ लाख होती. ती २०१५ मध्ये वाढून ५८.९५ लाखांवर पोचली आहे. २०१३ मध्ये हा आकडा केवळ १२.१९ लाख होता. विवरणपत्र न भरणाऱ्या करपात्र व्यक्तींवर कारवाई करून कर भरणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढविण्याचा प्राप्तिकर विभागाचा प्रयत्न आहे. विवरणपत्र भरणे आवश्यक असूनही ते न भरणाऱ्या व्यक्तीला दंडात्मक कारवाईत एक ते पाच हजार रुपयांचा दंड होऊ शकतो. कायदेशीर कारवाईत तीन महिने ते तीन वर्षांची शिक्षा आणि दंड होऊ शकतो. याआधी कर वसुली अधिकारी (टीआरओ) अगदी शेवटच्या टप्प्यात कारवाई करीत होते. मोठ्या प्रमाणात कर बुडविला असल्यास एखाद्या प्रकरणातच टीआरओ अटक अथवा ताब्यात घेण्याची कारवाई करीत होते. आता मात्र, करबुडव्यांची समस्या वाढल्याने कारवाईचे प्रमाण वाढविण्यात येईल.

# एनएसजीसाठी अटीतटीची लढाई

**नवी दिल्ली :** अणू पुरवठादार गटात (एनएसजी) भारताच्या सहभागासाठी प्रयत्न करण्यासाठी परराष्ट्र सचिव दक्षिण कोरियाची राजधानी सोल येथे जाण्याची शक्यता आहे. तसेच ताश्कंदमध्ये होणाऱ्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेनशनच्या (एससीओ) परिषदेवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदीही चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेण्याची दाट शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.

एनएसजी सदस्यांची दोन दिवसीय बैठक सोल येथे २३ जूनला सुरू होणार आहे. या गटातील सदस्यत्वासाठी भारताचे जोरदार प्रयत्न सुरू असून, यासाठी चीनचाच प्रामुख्याने अडथळा आहे. जयशंकर यांनी गेल्याच आठवड्यात गुप्तपणे चीन दौराही केला होता. मात्र अद्यापही चीनचा अप्रत्यक्ष विरोध आहे.

त्यामुळे जयशंकर हे बैठकीच्या काळात थेट सोलला जाऊनच भारताच्या सदस्यत्वासाठी प्रयत्न करणार असल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. या बैठकीकडे जयशंकर यांचे वैयक्तिकरीत्या लक्ष आहे. बैठकीत होणाऱ्या चर्चेचा अंदाज घेऊन ते भारताचा मुद्दा पुढे सरकविण्यासाठी सोलला जाण्याचा निर्णय घेऊ शकतात, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

या बैठकीचा मुख्य भाग २४ जूनला होणार आहे. याच दिवशी एससीओ परिषदेसाठी पंतप्रधान मोदी ताश्कंदला जात आहेत. या परिषदेला चीनचे अध्यक्ष शी जिनपिंगही उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे मोदीसुद्धा जिनपिंग यांची भेट घेऊन त्यांची समजूत घालतील, अशी चिन्हे आहेत.

# कलबुर्गी येथे आई व मुलीची हत्या

**सोलापूर/ कलबुरगी :** कलबुर्गी येथील डबराबादच्या एम.एम.कृष्णा कॉलनीत आई व मुलींची निर्घृण हत्या केल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली. असून हत्येमागील ठोस कारण अद्याप समजू शकले नाही. यल्लम्मा कृष्णय्या (वय ४०) व त्यांची मुलगी आशा कृष्णय्या (वय १६) अशी मृतांची नावे असून यल्लम्मा हिच्या डोक्यात दगड घालून हत्या करण्यात आली तर मुलगी आशा हिला चाकूने भोसकून मारण्यात आल्याचे पोलीसांनी सांगितले. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास हा खून झाल्याचे समजते. या घटनेची नोंद कलबुरगी ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

हत्येचे वृत्त समजताच जिल्हा पोलीस अधिक्षक एन. शशीकुमार, पोलीस उपअधिक्षक वाजिद पटेल, पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर तिगडी यांनी घटनास्थळाला भेट दिली. दरम्यान या हत्येनंतरर डबराबाद परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान मारेकरी अद्याप पोलीसांच्या हाती लागलेले नाहीत.

# दुष्काळी भागांत चांगला पाऊस

**मुंबई :** राज्यातील बहुतांश भागांत मॉन्सूनचे आगमन झाले असून, त्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यात एक जून ते २१ जून अखेर ६५.२ मिलिमीटर एवढा पाऊस झाला असून, तो जूनच्या सरासरीच्या ४१.७ टक्के एवढा आहे. गेल्या वर्षी याच सुमारास तो सरासरीच्या ९३.१ टक्के एवढा झाला होता. मॉन्सूनने हजेरी लावलेली असली तरी त्यामध्ये सातत्य नसल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

**धरणांत नऊ टक्के साठा**

सर्व प्रकल्पांत आज (ता. २१ जून) केवळ नऊ टक्के साठा शिल्लक असून, गेल्या वर्षी याच सुमारास १७ टक्के साठा होता.

विभागनिहाय सध्याचा आणि कंसात गतवर्षीचा साठा पुढीलप्रमाणे :

मराठवाडा- १ टक्के (७), कोकण- २८ टक्के (३०), नागपूर- १६ टक्के (२०), अमरावती- १० टक्के (२५), नाशिक- ८ टक्के (१५) आणि पुणे- ७ टक्के (१९).

# औरंगाबादेतून चौथ्यांदा हृदयाचा प्रवास



**औरंगाबाद :** अवयवदानाचे केंद्र म्हणून पुढे आलेल्या औरंगाबाद येथून हृदयाचा चौथ्यांदा प्रवास झाला आहे. मंगळवारी (ता. २१) मेंदूचे काम थांबलेल्या युवकाच्या अवयवदानातून चौघांना जीवदान मिळाले. प्रथमच शहरातील डॉक्टरांनी हृदय काढून मुंबई येथे घेऊन जात प्रत्यारोपणही केले, अशा प्रकारचा हा मराठवाड्यातील पहिलाच प्रयोग ठरला आहे.

वैजापूर तालुक्यातील माळी घोगरगाव येथील संतोष कारभारी गुंड या (वय ३३) युवकाचा रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास वाळूज औद्योगिक वसाहतीत अपघात झाला. त्यांना तातडीने येथील युनायटेड सिग्मा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले; मात्र डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मेंदूवर सूज आली आणि मेंदूचे काम थांबले. त्यानंतर वैद्यकीय समाजसेवक संदीप चव्हाण यांनी गुंड कुटुंबीयांचे समुपदेशन करून अवयवदानाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यानंतर जवळपास चार तासांनी घरच्या मंडळींनी अवयवदानास संमती दिली. याबद्दल डॉ. उन्मेष टाकळकर म्हणाले, गुंड यांच्या कुटुंबीयांनी अवयवदान सहकार्य केल्यामुळे चार जणांना जीवदान मिळाले आहे. मंगळवारी पहाटे तीनच्या सुमारास अवयव काढण्यास सुरवात केली. साडेसहा वाजता हृदय बाहेर काढण्यात आले. विशेष म्हणजे आतापर्यंत हृदय काढण्यासाठी जेथे हृदय पाठवायचे आहे, तेथील हृदय शल्यचिकित्सकाला यावे लागत असे. मात्र प्रथमच येथील डॉ. आनंद देवधर यांनी हृदय काढण्याचे काम केले. तसेच मुंबईत जाऊन प्रत्यारोपणाच्या कामातही सहभाग घेतला. तर गुंड यांचे यकृत पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल येथे सकाळी साडेसातच्या सुमारास पाठविण्यात आले. एक किडनी कमलनयन बजाज हॉस्पिटलमधील रुग्णाला, तर दुसरी सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलमधील रुग्णास देण्यात आली. संतोष यांच्या अवयवदानातून चौघांना जीवदान मिळाले आहे.

# ९७२ घरांसाठी म्हाडाची सोडत



**मुंबई :** गिरणी कामगारांच्या घरांची सोडत काढल्यानंतर, म्हाडा प्राधिकरणाने आता सर्वसामान्यांसाठी परवडणाऱ्या घरांची सोडत काढली आहे. ९७२ घरांसाठी ही सोडत काढण्यात आली असून म्हाडाने यासंबंधीची जाहिरातही प्रसिद्ध केली आहे. २३ जून ते २३ जुलैपर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे. पण जर ऑनलाइन अर्ज करत असाल तर २४ जून ते २५ जुलैपर्यंत मुदत आहे. २४ जून ते २७ जुलै दरम्यान बँकेत डीडी भरु शकता. १० ऑगस्टला घरांच्या लॉटरीचा निकाल जाहीर करण्यात येईल.

प्रत्यक्षात ३१ मे रोजी सर्वसामान्यांसाठीच्या परवडणाऱ्या घरांची सोडत काढण्यात येणार होती. मात्र, गिरणी कामगारांच्या सोडतीच्या प्रक्रियेमुळे सर्वसामान्यांच्या घरांच्या सोडतीला विलंब झाला, असे स्पष्टीकरण प्राधिकरणाने दिले होते. यावर गृहनिर्माणमंत्री प्रकाश मेहता यांना प्रसारमाध्यमांनी विचारले असता घरांच्या सोडतीसाठीच्या सॉफ्टवेअर अपग्रेडशनफ्चे काम सुरू होते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या घरांच्या सोडतीसाठी विलंब झाला. मात्र, आता हे काम अंतिम टप्प्यात आहेफ, अशी माहिती दिली होती.

**घरं कुठे?**

सायन, प्रतीक्षानगर, मानखुर्द, मुलुंड, सायन, पवई, बोरिवली, शिंपोली, गोरेगाव, वर्सोवा, दहिसर, चांदिवली येथे ही घरे असून यात उच्च उत्पन्न गटांच्याही घरांचा समावेश आहे.

# भारत-पाकने मिळून प्रयत्न करावेत

**बीजिंग :** अणू पुरवठादार गटाच्या (एनएसजी) सदस्यत्वासाठी भारताने एकट्यानेच प्रयत्न करण्यापेक्षा भारत आणि पाकिस्तान दोघांनी मिळून प्रयत्न करावेत, असे आवाहन चीनने केले आहे. यामुळे या गटातील प्रवेशासाठी भारताच्या प्रयत्नांना आडकाठी आणण्याचे चीनचे धोरण कायमच असल्याचे स्पष्ट झाले आहे.

एनएसजीच्या आगामी बैठकीवेळी भारताच्या सदस्यत्वाचा मुद्दा प्राधान्याने येणार नसल्याचे चीनने नुकतेच सांगितले होते. आगामी बैठकीच्या पार्श्वभूमीवर चीनच्या पाठिंब्याबाबत भारत सरकार आशावादी असल्याचे परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी म्हटले होते. तसेच, यासाठी परराष्ट्र सचिव एस. जयशंकर यांनी गुप्तपणे चीन दौराही केला होता. तरीही आज चीनने सरकारी मालकीच्या वृत्तपत्रातून भारताला अप्रत्यक्ष विरोध केला आहे. सदस्यत्वासाठी प्रयत्न करत असतानाच भारत हा पाकिस्तानच्या या गटातील समावेशाला मात्र विरोध करत आहे. पाकिस्तानमध्ये अणुशक्ती सुरक्षित नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मात्र, पाकिस्तानमधील अण्वस्त्र प्रसार हा डॉ. अब्दुल कादीर खान यांनी केला होता, ते पाकिस्तानचे अधिकृत धोरण नव्हते, असे वृत्तपत्रातील एका लेखात म्हटले आहे. भारताचा प्रश्न सुटून पाकिस्तानमध्ये मोठे प्रश्न निर्माण होणार असल्यानेच चीनचा भारताला विरोध असल्याचे चीनने म्हटले आहे. मात्र, भारताने पाकिस्तानसह सदस्यत्वासाठी प्रयत्न केले तर अधिक चांगले होईल. आम्ही कोणत्याही देशाला लक्ष्य केलेले नाही. मात्र, एनपीटीचा नियम पाळायला हवा. हा नियम अमेरिकेनेच केला असताना तेच आता नियमाविरुद्ध जात आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

भारताने अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर (एनपीटी) स्वाक्षरी केली नसल्याने त्यांना या गटात प्रवेश देऊ नये, असे चीनचे म्हणणे आहे. मात्र, भारताचा इतिहास पाहता अणुशक्तीचा भारताकडून गैरवापर होण्याची शक्यता नसल्याने अमेरिकेसह अनेक मोठ्या देशांनी पाठिंबा दिला आहे.

# साखर कारखान्यांची स्थिती गंभीर

**पुणे :** राज्यातील दुष्काळाची स्थिती पाहता उस लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यामुळे यंदा साखर कारखान्यांची स्थिती अतिशय गंभीर असून मराठवाड्यातील ६० ते ७० कारखान्यांपैकी केवळ ५ कारखानेच सुरू राहतील, सोलापूर जिल्ह्यातही अशीच स्थिती असल्याने साखर कारखान्यांपुढे मोठे आर्थिक संकट आहे, असे माजी केंद्रीय कृषीमंत्री आणि खासदार शरद पवार यांनी मंगळवारी येथे सांगितले.



महाराष्ट्रातील साखर कामगार संघटनाच्या सुधारित वेतन कराराबाबत तसेच कामगारांच्या मागणीसाठी साखर संघ आणि साखर कामगारांच्या प्रतिनिधींची खास बैठक पवार यांच्या उपस्थितीत साखर संकुल येथे बोलविण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, राज्य शासनाच्या वेतन करार समितीचे अध्यक्ष शिवाजी पाटील यांच्यासह साखर कारखान्यांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. पवार म्हणाले, की दोन वर्षांपूर्वी साखर कामागारांचा वेतन करार संपलेला आहे. सुधारित वेतन करारासाठी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. त्याबाबत समितीने कामगार आणि संघाच्या प्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर त्यांच्यात तोडगा निघू शकला नाही.